# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 12.03.2025** **वार- बुधवार**

---

**गुंतवणूक**

पुणे जिल्ह्यातील उद्योगांना सामाजिक सुरक्षितता प्रदान करण्याला प्रशासनाचं उच्च प्राधान्य असून, कोणत्याही घटकाकडून त्रास होत असल्यास उद्योगांनी निर्भिडपणे त्याची माहिती द्यावी, असं आवाहन विभागीय आयुक्त डॉक्टर चंद्रकांत पुलकुंडवार यांनी आज केलं.

औद्योगिक संघटना, सूक्ष्म, लघू आणि मध्यम उपक्रम, मोठे उद्योजक, बँकर्स यांच्या औद्योगिक गुंतवणूक परिषदेत ते बोलत होते. या परिषदेत ५० लाख ते १ हजार ५०० कोटी रुपयांपर्यंत गुंतवणुकीचे सामंजस्य करार होणार असल्याचं सांगण्यात आलं.

**पाणी**

पुणे शहरात गेल्या काही दिवसांपासून विविध भागांत कमी दाबानं आणि अपुरा पाणीपुरठा होत आहे. मागणी वाढल्यानं टाकीत पूर्ण दाबाची पातळी येण्याआधीच पुरठा सुरू करावा लागत आहे.
सोसायट्यांच्या टाक्या भरत नसल्याच्या तक्रारी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडे करण्यात आल्या आहेत.

**सूर्यघर**

राज्य सरकारच्या पहिल्या शंभर दिवसांत प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या सव्वा लाखापेक्षा अधिक करण्याचं आणि एकंदर वीजनिर्मिती क्षमता 500 मेगावॅट करण्याचं उद्दीष्ट महावितरणनं 82 दिवसात पूर्ण केलं आहे. 82 दिवसात 57 हजारहून अधिक घरांवर सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविण्यात आले. यामध्ये नागपूर प्रथम तर पुणे दुसऱ्या क्रमांकावर आहे अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

**क्षयरोग**

पुणे जिल्ह्यात २२ मार्चपर्यंत अतिजोखिमीच्या भागांमध्ये सक्रिय क्षयरोग शोधमोहीम राबविण्यात येणार आहे. कारागृहातील कैदी, दिव्यांग शाळा आणि वसतिगृहं, वृद्धाश्रम, बांधकाम कामगार, निर्वासितांची छावणी, औद्योगिक कामगार वसाहत, आदिवासी वाडी-वस्ती, गावं आणि वस्त्यांवर ही मोहीम राबविण्यात येत आहे.

**ई-रक्तकोष**

गरजू रुग्णांना रक्तासाठी धावपळ करावी लागू नये यासाठी केंद्र शासनानं ई-रक्तकोष पोर्टल विकसित केलं आहे. त्यामुळं थॅलेसिमिया, हिमोफिलीया, सिकलसेल आणि रक्ताशी निगडीत इतर आजारांच्या गरजू रुग्णांना दैनंदिन रक्तसाठ्याची माहिती सहज उपलब्ध होणार आहे. राज्यात शासकीय, निमशासकीय, ट्रस्ट, कार्पोरेशन, खासगी अशा ३९५ रक्तपेढ्या आणि रक्तकेंद्रांचं जाळं आहे.

**सिंहगड**

सिंहगड रस्त्यावरील राजाराम पुलापासून धायरीच्या दिशेनं जाणाऱ्या सुमारे २ हजार १०० मीटर लांबीच्या उड्डाणपुलाचे उद्घाटन पुढील महिन्यात होणार आहे.

**नंबरप्लेट**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार राज्यात सर्व वाहनांना उच्च सुरक्षितता क्रमांक पट्टी लावण्यासाठी मुदत तीन महिने वाढवून मिळावी, अशी मागणी आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी आज विधानसभेत केली. सध्या ही मुदत ३० एप्रिलपर्यंत आहे. केवळ पुणे शहरातच सर्व प्रकारची ४० लाख वाहनं आहेत. त्यापैकी २ लाख वाहनांना आतापर्यंत पट्टी बसविण्यात आली आहे. संख्या पाहता ३० एप्रिलपर्यंत पुण्यातील सर्व वाहनांना एचएसआरपी पट्टी लावणं सध्याच्या वेगानं अशक्य आहे याकडं आमदार शिरोळे यांनी सभागृहाचे लक्ष वेधलं.

**<u>महाशिबीर</u>**

पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत सासवड इथल्या वाघीरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात विधी सेवा महाशिबीर आणि शासकीय योजना महामेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे. 16 मार्चला सकाळी साडेदहा वाजता या उपक्रमाची सुरुवात होईल.

**<u>धर्मवीर</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत बोऱ्हाडेवाडी इथं ताब्यात आलेल्या जागेत धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा १०० फुट उंच पुतळा उभारण्याच्या विषयाला मान्यता देण्यात आली. केशवनगर इथल्या विद्युत दाहिनीची ३ वर्षासाठी देखभाल दुरुस्ती करणं, इत्यादि कामांसाठी आर्थिक खर्चाची तरतूदही या बैठकीत करण्यात आली.

**<u>रस्ते</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि ग्लोबल डिझाइनिंग सिटीज इनिशेटिव्ह या संस्थेच्या वतीनं शहरातील रस्ते अधिक सुरक्षित करण्याचा उद्देशानं एका कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं. स्थानीय संदर्भ लक्षात घेऊन या कार्यशाळेत महापालिका अभियंते आणि पोलीस

यांना जगातील रस्ते सुरक्षितता या विषयावर राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली.

**<u>बाजार</u>**

धुलीवंदनानिमित्त येत्या शुक्रवारी पुणे कृषी उत्पन्न बाजार समिती आवारातील फुलांचा बाजार आणि मोशी उपबाजार बंद राहणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील आणि राज्यातील विविध भागातील फुल उत्पादकांनी माल बाजारात आणू नये असं आवाहन समिती प्रशासनाच्या वतीनं करण्यात आलं आहे. बाजार समिती आवारातील फळे, भाजीपाला, केळी विभाग, पान विभाग, गूळ भुसार विभाग त्याचप्रमाणं मांजरी उपबाजार सुरू राहतील अशी माहिती समिती प्रशासनानं दिली आहे.

**<u>जयंती</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आज आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त विद्यापीठाच्या सरस्वती सभागृहात मान्यवरांनी चव्हाण यांच्या तैलचित्रावर पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**